
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती ■ वर्ष १ ■ अंक ४१ ■ रविवार दि. ५ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/26/A2977 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### एकाच कुटुंबातील पाच जण बेपत्ता!

नागपूर : नागपूरच्या धंतोली परिसरातून एकाच कुटुंबातील पाच जण अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. २४ जूनपासून हे पाचही सदस्य घरातून निघून गेल्यानंतर परतले नसल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी धंतोली पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांकडून विविध दिशांनी तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात बेपत्ता सदस्यांच्या मोबाईलचे शेवटचे लोकेशन पुणे येथे आढळून आल्याची माहिती समोर आली आहे.

---

### गॅस टँकरची ट्रकला धडक, दोघांचा मृत्यू!

जळगाव : पारोळा-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील सबगव्हाण टोलनाक्याजवळ एका गॅस टँकरनं दुसऱ्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने या भीषण अपघातामध्ये दोन जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला आहे. तर या अपघातात मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवण्यात आली आहे. ही घटना टोल नाक्यावर घडली असल्याने त्या ठिकाणी भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. टोल नाक्यावर एका गॅस टँकरने पाठीमागून एका ट्रकला जोरदार धडक दिली. अपघातानंतर टँकरला आग लागली, या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर सदर गॅस टँकरला आग लागल्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलेलं असताना प्रशासनानं तत्काळ दखल घेत पारोळा अग्निशामक दलाचे कर्मचाऱ्यांना तसेच रुग्णवाहिका चालकांना तत्काळ घटनांसाठी दाखल केलं.

# आमदार धीरज लिंगाडे एकनाथ शिंदेंच्या संपर्कात!

## खा. संजय राऊत यांची माहिती, 20 कोटींची ऑफर दिल्याचा दावा

प्रतिनिधी दि. ५ जुलै

**मुंबई :** महाविकास आघाडीतील काँग्रेसचे पदवीधर आमदार धीरज लिंगाडे यांना शिंदे शिवसेनेकडून २० कोटींची ऑफर आली असून, ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा दावा खा. संजय राऊत यांनी केला आहे. तो आमचा आमदार नाही. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे, चर्चा सुरु असता, अमुक माणसाला ऑफर देण्यात आली आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले. ते रविवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होते. खा. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, माझ्या कानावर आले आहे की, लिंगाडे नावाचे आमदार आहेत त्यांना २० कोटी रुपयांची ऑफर आली आहे. काल परवाची गोष्ट आहे. धीरज लिंगाडे हे काँग्रेसचे विधान परिषदेतील आमदार



आहेत. त्यांना शिंदे गटाकडून २० कोटी रुपयांची ऑफर आणि आगामी निवडणुकीत आमदारकी देण्याचे आश्वासन दिल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. ते पुढे म्हणाले, एकनाथ शिंदेंच्या प्रकृतीला आराम पडो. तुमच्या हातात अफाट सत्ता, यंत्रणा आणि राम मंदिरातील लुटलेला पैसा आहे. हा राम मंदिरातून लुटलेला पैसा आहे. हा पापाचा पैसा पचणार नाही. जे सहा फुटीर खासदार असतील, त्यांना हा पैसा तुम्हाला आणि तुमच्या मुलाबाळांना पचणार नाही, असे संजय राऊत यांनी म्हटले. हिंदुत्त्वाचे धर्मग्रंथ, वेद-पुराण वाचा. रामकृष्णही आले गेले, तेही जगले नाहीत. महाभारताचं युद्ध त्यांनी जिंकलं, सगळ्यांना जावं लागलं. मोदी अमर आहेत का, अमित शाह अमर आहेत का, फडणवीस-शिंदे अजराअमर आहेत का?, असा सवालही यावेळी संजय राऊत यांनी उपस्थित केला.



### राऊतांच्या दाव्यावर भाजपची प्रतिक्रिया

संजय राऊत यांनी पदवीधरचे आमदार लिंगाडे यांना महायुतीकडून २० कोटीची ऑफर असल्याचा दावा केल्यानंतर भाजप आमदार पंकज भोयर यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, एखाद्या लोकप्रतिनिधीबद्दल संजय राऊत यांनी अशाप्रकारे वक्तव्य करणे योग्य नाही. त्यांच्या याच वक्तव्यांमुळे त्यांच्या पक्षातील लोक त्यांना सोडून जात आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले.

### मंगळवारी मातोश्रीवर तातडीची बैठक

खासदार - आमदार फुटीनंतर उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर आमदारांची बैठक बोलावली आहे. मंगळवारी संध्याकाळी ७ वाजता ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. सचिन अहिर यांच्या फुटीनंतर बैठक बोलवली असल्याची माहिती आहे. ठाकरे गटातील आणखी काही आमदार फुटणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या पार्श्वभूमीवर मातोश्रीवर बैठकीकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

# मंदिरात दरोडा टाकणारे आम्हाला हिंदुत्व शिकवणार का ?

## राम मंदिर देणगी घोटाळाप्रकरण ; राऊतांची टीका

प्रतिनिधी दि. ५ जुलै

**मुंबई :** मतदारसंघांच्या पुनर्रचना विधेयकासाठी (डिलिमिटेशन बिल) आवश्यक असलेला बहुमताचा आकडा भाजप सरकार कितीही पक्ष आणि खासदार फोडले तरी गोळा करू शकत नाही, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. तसेच, अयोध्येतील राम मंदिराच्या नावावर भाजपच्याच लोकांनी मोठी लूट केली असून, या कथित घोटाळ्याविरोधात आजपासून शिवसेना तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. संजय राऊत म्हणाले की, आम्ही खऱ्या हिंदुत्वासाठी आंदोलन करत असून सत्ताधाऱ्यांनीही यात सामील व्हायला हवे. आम्ही हिंदुत्व सोडले, अशी टीका करणाऱ्यांना राम मंदिरात पडलेला दरोडा दिसत नाही का? अयोध्येत सीतामातेचे मंगळसूत्र चोरले गेले असून, ही चोरी कोणत्याही बाहेरील व्यक्तीने केली नसून, तेथील विश्वस्त आणि भाजपशी संबंधित लोकांनीच केली आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच राम मंदिरातील या कथित लुटीचे नेतृत्व स्वतः पंतप्रधान करत असल्याचा घणाघातही त्यांनी केला आहे. संजय राऊत म्हणाले की, सत्ताधाऱ्यांकडे केवळ केंद्रीय तपास यंत्रणा आणि राम मंदिरातून लुटलेला पैसाच आहे. कंत्राटदारांकडून मोठ्या प्रमाणावर देणग्या गोळा करून अयोध्येत कार्यक्रम साजरे करण्यात आले होते. हा पापाचा पैसा कोणालाही पचणार नाही. सध्या अधिवेशन सुरू असून विरोधकांना रोज पक्षबदलासाठी ऑफर्स दिल्या जात असल्याच्या चर्चा आहेत. मात्र, माणसाला किती हव्यास असावा? ज्याला कुठे थांबायचे हे कळत नाही, त्याचा अंत निश्चित असतो, असे सांगत पक्ष फोडणारे हे सरकार लवकरच कोसळेल, असा इशारा त्यांनी दिला. संजय राऊत म्हणाले की, या पृथ्वीतलावर राम आणि कृष्ण हे आले आणि गेले, महाभारत जिंकल्यानंतर त्यांनाही आपला देह सोडावा लागला. मग मोदी, शहा, फडणवीस किंवा शिंदे हे काय अमर आहेत का? प्रत्येकाला एक दिवस जावेच लागते. सत्ता, पैसा आणि यंत्रणेच्या बळावर आमदार-खासदार आणि कार्यकर्ते फोडण्याचे घाणेरडे राजकारण देशात आणि राज्यात सुरू आहे. आमदारांना तर तब्बल २० कोटींची ऑफर देण्यात आली होती. पैशांच्या आणि सत्तेच्या याच अवाजवी हव्यासापोटी निर्माण झालेल्या तणावामुळे आज सत्ताधाऱ्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागत आहे. तर शिंदे आजारी असतील तर त्यांच्या प्रकृतीला नक्कीच आराम पडो. पण त्यांच्या प्रकृतीसोबतच सध्या राजकारणामुळे बिघडलेल्या महाराष्ट्राच्या प्रकृतीलाही आराम मिळणे गरजेचे आहे. माणसाला किती हव्यास असावा याला काही मर्यादा असायला हवी. कुठे थांबायचे हे न कळल्यामुळेच वाढत्या मानसिक तणावाचा सामना करावा लागत असून नेत्यांवर रुग्णालयात भरती होण्याची वेळ येत आहे, असा टोला त्यांनी शिंदेंचा नाव न घेता लगावला आहे.



**तिसऱ्यांदा बोहल्यावर :** बॉलिवूडचे 'मिस्टर परफेक्शनिस्ट' आमिर खान आज विवाहबंधनात अडकले. वयाच्या ६१ व्या वर्षी, आमिरने तिसऱ्यांदा लग्न करून आपली प्रेयसी गौरीला जीवनसाथी बनवले आहे. आमिर आणि गौरी यांनी नोंदणीकृत विवाह केला असून ते आता पती-पत्नी झाले आहेत.




# जनतेच्या समस्येपेक्षा शिंदेसेनेत आपसात 'नुराकुस्ती'

प्रतिनिधी दि. ५ जुलै

**अकोला :** अकोला शहर आणि जिल्ह्यात सध्या नागरी समस्यांचा डोंगर उभा राहिला आहे. खड्डेमय रस्ते, पाण्याचा तुटवडा, आरोग्य आणि स्वच्छतेचे खोळंबलेले प्रश्न यामुळे सर्वसामान्य जनता चांगलीच होरपळून निघत आहे. मात्र, सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधी आणि नेत्यांना जनतेच्या या मूलभूत प्रश्नांशी काहीही देणेघेणे उरलेले नाही, असेच चित्र सध्या जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. जनतेला वाऱ्यावर सोडून शिंदेसेनेचे स्थानिक नेते सध्या 'एसी'च्या हवेत मस्त असून, पक्षीय पदांच्या लालसेपोटी आपापसातच 'नुराकुस्ती' खेळण्यात व्यस्त आहेत. पाणी, वीज आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना दररोज संघर्ष करावा लागत आहे.



या गंभीर समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आंदोलन करणे किंवा प्रशासनाला जाब विचारणे तर दूरच, पण शिंदेसेनेचे बडे नेते मात्र वातानुकूलित कार्यालयात आणि गाड्यांमध्ये बसून केवळ स्वतःच्या पदांची गणिते मांडण्यात मग्न आहेत. जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढवण्याऐवजी केवळ वैयक्तिक गट निर्माण करून स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न स्थानिक नेत्यांकडून केला जात आहे. पदाच्या लालसेपोटी सुरू असलेल्या या अंतर्गत नुराकुस्तीमुळे सामान्य जनतेमध्ये शिंदेसेनाविरोधात तीव्र नाराजी पसरली आहे.

### गटबाजी शिगेला; केवळ पदांसाठी चढाओढ

शिवसेनेच्या शिंदे गटात अकोला जिल्हा कार्यकारिणीत स्थान मिळवण्यासाठी आणि जिल्हा प्रमुख पदासाठी सध्या तीव्र चढाओढ सुरू आहे. नुकतीच यासाठी मुलाखतींची प्रक्रिया पार पडली, ज्यामध्ये अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. मूळ शिवसेनेतून आलेल्या आणि नंतर पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये जुना विरुद्ध नवा असा सुप्त संघर्ष पेटला आहे. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि मानाची पदे लाटण्यासाठी नेत्यांमध्ये अंतर्गत धुसफूस इतकी वाढली आहे की, वाद थेट पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचला आहे. एकीकडे पक्षांतर्गत गटबाजीने शिगेची पातळी गाठली असताना, दुसरीकडे अकोल्यातील सामान्य जनता मात्र कमालीची त्रस्त आहे.

# बंदीच्या काळात शहरात जडवाहतुकीचा सुसाट प्रवास

## सोमवारपासून वाहतुक नियंत्रणाची गरज

प्रतिनिधी दि. ५ जुलै

**अकोला :** शाळा सुरु झाल्या आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहतुक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरात जडवाहुतकीस बंदी असताना त्याचे नियंत्रण मात्र होताना दिसत नाही. शहरातील विविध चौकात शहर वाहतुक शाखेचे कर्मचारी नियंत्रणासाठी नसल्याची ओरड कायम आहे. सोमवार पासून शहरातील व्यवस्थापन योग्य होण्याची अपेक्षा पालकांनी व्यक्त वेली आहे. अकोला शहरातील अनेक मोठ्या शाळा या मुख्य रस्त्यावर आहे. शहरात शाळा सुरु झाल्यापासून शाळकरी विद्यार्थी, ऑटो, स्वुल बस, शाळांचे शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थ्यांना शाळेतून आणण्यासाठी आणि सोडण्यासाठी येणारे पालक या सर्वांची वाहने रस्त्यावर धावत आहे. असे असताना मोठ्या प्रमाणात वाहतुक व्यवस्थापन व नियंत्रण काळाची गरज आहे. शहरात जडवाहतुक बंदीच्या काळात मोठ्या प्रमाणात अवजड ट्रक धावत असून त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहर वाहतुक शाखेच्या दूर्लक्षामुळे शहरातील जडवाहतुकीस कोणाची हिरवी झेंडी आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे.




# फक्त एका ब्लड टेस्टने होणार १० प्रकारच्या कॅन्सरचे निदान!

## भारतातील वैद्यकीय क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल

प्रतिनिधी दि. ५ जुलै

**मुंबई :** कॅन्सर हे आरोग्यापुढील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक बनले आहे. अनेकदा कॅन्सरची लक्षणे दिसायला लागल्यावर, म्हणजेच अगदी शेवटच्या टप्प्यात या आजाराचे निदान होते, ज्यामुळे उपचारात मोठ्या अडचणी येतात. परंतु, आता कॅन्सरच्या सुरुवातीच्या टप्प्यातच शोध घेण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रात एक अत्यंत क्रांतिकारी पाऊल उचलण्यात आले आहे.

अहमदाबादस्थित 'झायडस लाइफसायन्सेस'ने 'अपोलो हॉस्पिटल्स' सोबत भागीदारी करून भारतात 'शील्ड मल्टी-कॅन्सर डिटेक्शन' ही अत्याधुनिक रक्त तपासणी उपलब्ध करून दिली आहे. या अत्याधुनिक



चाचणीच्या माध्यमातून केवळ एकाच वेळेस घेतलेल्या रक्ताच्या नमुन्यावरून तब्बल १० प्रकारच्या सामान्य कॅन्सरचा शरीरातील धोका ओळखता येऊ शकणार आहे. अमेरिकेतील प्रसिद्ध प्रिसिजन ऑन्कोलॉजी कंपनी 'गार्डंट हेल्थ'ने ही 'मल्टी-कॅन्सर अर्ली डिटेक्शन' टेक्नॉलॉजी विकसित केली आहे. भारतात ही तंत्रज्ञानयुक्त चाचणी उपलब्ध होण्याची ही पहिलीच वेळ आहे. तज्ज्ञांच्या मते, ही चाचणी कॅन्सर स्क्रीनिंगच्या क्षेत्रात मोठा बदल घडवून आणू शकते, मात्र ही नियमित पारंपारिक चाचण्यांना पूर्ण पर्याय नाही, असा सल्लाही त्यांनी दिला आहे. 'शील्ड एमसीडी' टेस्ट एकाच ब्लड टेस्टद्वारे अनेक कॅन्सरचे सिग्नल्स शोधते, ज्यामुळे रुग्णाला मानसिक आणि शारीरिक त्रास कमी होतो. मात्र, डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे की, या चाचणीचा रिझल्ट 'पॉझिटिव्ह' आला म्हणजे रुग्णाला कॅन्सर आहेच असे नाही. याचा अर्थ पुढील तपासण्या करण्याची गरज आहे. तसेच, रिझल्ट 'नेगेटिव्ह' आला तरी कॅन्सरचा धोका संपूर्ण टळला असे होत नाही, त्यामुळे डॉक्टरी सल्ले घेणे आवश्यक आहे.

### काय आहे 'शिल्ड एमसीडी' टेस्ट

ही चाचणी प्रामुख्याने ४५ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या अशा प्रौढ व्यक्तींसाठी आहे, ज्यांना कॅन्सर होण्याचा सामान्य धोका असू शकतो. ही टेस्ट एखाद्या विशिष्ट कॅन्सरचा शोध घेत नाही, तर रक्तातील डीएनएच्या छोट्या तुकड्यांमधील रासायनिक बदलांचा म्हणजेच 'मेथिलेशन पॅटर्न'चा अभ्यास करते. जेव्हा कॅन्सर पेशी रक्तात डीएनए सोडतात, तेव्हा हे तंत्रज्ञान ते ओळखते. ॲडव्हॉन्सड जेनोमिक्स आणि एआयच्या मदतीने ही टेस्ट शरीरातील असामान्य डीएनए सिग्नल्स शोधून काढते आणि कॅन्सर शरीराच्या कोणत्या भागात निर्माण होत आहे, याचा अंदाज लावते.

---

### या १० कॅन्सरचा लावणार छडा

स्तन कॅन्सर, फुफ्फुसाचा कॅन्सर, कोलोरेक्टल/मोठ्या आतड्याचा कॅन्सर, यकृताचा कॅन्सर, स्वादुपिंडाचा कॅन्सर,गर्भाशयाचा कॅन्सर, प्रोस्टेट कॅन्सर, मूत्राशयाचा कॅन्सर, पोटाचा कॅन्सर आणिअन्ननलिकेचा कॅन्सर आदींचा शोध लावणार आहे.

## केंद्रीय विद्यालय येणे स्वागतार्ह

अकोल्यात केंद्रीय विद्यालय येत आहे ही बाब स्वागतार्ह आहे. येथे अद्ययावत संगणक प्रयोगशाळा, क्रीडांगणे आणि डिजिटल क्लासरूम्सची सोय केली जाते. खाजगी शाळांच्या तुलनेत येथील फी अत्यंत कमी आणि सामान्यांना परवडणारी असते.

परंतु हे पण लक्षात घेतले पाहिजे की येथे प्रवेश हा प्राधान्यक्रमाने संरक्षण दलातील कर्मचारी आणि माजी सैनिक, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि स्वायत्त संस्थांचे कर्मचारी, राज्य सरकारी कर्मचारी यांना दिला जातो व नंतर जागा शिल्लक असल्यास स्थानिक आणि इतर सर्वसामान्य नागरिकांच्या पाल्यांना प्रवेश दिला जातो. त्यामुळे ही शाळा केंद्रीय व राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना अधिक उपयुक्त ठरणार आहे. तसेच नवीन शाळा सुरू झाल्याने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर नवीन नोकऱ्या उपलब्ध होतील. अकोला येथे केंद्रीय विद्यालय व्हावे ही मागणी माजी केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्याकडे करण्यात आली होती. परंतु त्यांचे सुपुत्र अनुप धोत्रे खासदार असताना त्यांच्या कार्यकाळात मंजुरी मिळाली ही आनंदाची बाब आहे असे वैधानिक विकास मंडळाचे माजी सदस्य डॉ. संजय खडक्कार यांनी म्हटले आहे.

# भारताचे ‘ बीग बुल ’ राकेश झुनझुनवाला !

भारतीय शेअर बाजारातील प्रसिद्ध गुंतवणूकदार राकेश झुनझुनवाला आता आपल्यात नसले तरी त्यांची कहाणी आजही लाखो लोकांसाठी प्रेरणादायी आहे. त्याची कहाणी इतकीच रंजक आहे. अवघ्या ५ हजारापासून केली सुरुवात करीत जगाचा निरोप घेताना तब्बल ४० हजार कोटींचा मालक; असा होता शेअर मार्केटच्या बिग बुलचा प्रवास.

राकेश झुनझुनवाला हे भारतीय शेअर बाजारातील सर्वात यशस्वी गुंतवणूकदार आणि उद्योगपती होते. त्यांना भारतीय शेअर बाजाराचे 'वॉरेन बफे' आणि 'बिग बुल' म्हणून ओळखले जायचे. १९८५ मध्ये अवघ्या ५ हजार रुपयांपासून सुरू केलेली त्यांची गुंतवणूक, त्यांची एकूण संपत्ती अब्जावधी रुपयांपर्यंत पोहोचली होती. राकेश झुनझुनवाला यांचा जन्म ५ जुलै १९६० रोजी हैदराबाद (तेलंगणा) येथे एका राजस्थानी कुटुंबात झाला. त्यांचे बालपण मुंबईत गेले. त्यांचे वडील इन्कम टॅक्स कमिशनर होते.

झुनझुनवाला यांनी सिडनहॅम कॉलेजमधून वाणिज्य शाखेची पदवी घेतली आणि नंतर ते 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' मधून चार्टर्ड अकाउंटंट झाले.

### शेअर मार्केटची प्रेरणा वडिलांकडून मिळाली

शेअर मार्केटमध्ये येण्याची प्रेरणा राकेश झुनझुनवाला यांना वडिलांकडून मिळाली. व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट असलेल्या झुनझुनवाला यांनी पहिल्यांदा शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना पैसे देण्यास नकार दिला. यासोबतच वडिलांनी मित्र किंवा नातेवाईकाकडून कर्ज घेऊन बाजारात पैसे गुंतवू नयेत, अशा सूचनाही दिल्या. यानंतर झुनझुनवालाने आधी काही पैसे कमावले आणि नंतर शेअर मार्केटमध्ये प्रवेश केला.

### 'टाटा-टी'ने पहिले यश दिले

झुनझुनवाला यांनी १९८५ मध्ये ५००० रुपये गुंतवून गुंतवणूकदार म्हणून करिअरला सुरुवात केली. त्यांना यशस्वी करण्यात टाटा समूहाच्या शेअर्सचा मोठा वाटा आहे. एकेकाळी त्यांनी टाटा टी या टाटा समूहाच्या कंपनीचे पाच हजार शेअर्स ४३ रुपयांना विकत घेतले. तीन महिन्यांत टाटा टीचा शेअर दर मोठ्या प्रमाणात वाढला. त्यानंतर झुनझुनवाला यांनी ते १४३ रुपयांना ते घेतलेले शेअर विकले. ही गोष्ट १९८६ च्या सुमारातील आहे. झुनझुनवालांना या डीलमधून २.१५ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर तीन महिन्यांत पाच लाख रुपयांचा नफा झाला.

१९८५ मध्ये जेव्हा बीएसई सेन्सेक्स फक्त १५० अंकांवर होता, तेव्हा त्यांनी शेअर बाजारात पाऊल ठेवले. त्यांनी टाटा टीचे ५००० शेअर्स ४३ रुपयांना खरेदी केले आणि काही महिन्यांतच ते १४३ रुपयांना विकले, ज्यातून त्यांना मोठा नफा झाला. दीर्घकालीन गुंतवणुकीची त्यांची अचूक समज आणि कंपन्यांमधील वाढ ओळखण्याची त्यांची क्षमता यामुळे त्यांनी अनेक मल्टीबॅगर शेअर्स शोधून काढले. 'टायटन', 'टाटा मोटर्स', 'क्रिसिल' आणि 'लुपिन' यांसारख्या कंपन्यांमध्ये त्यांनी केलेली गुंतवणूक खूप यशस्वी ठरली.

शेअर व्यापाराव्यतिरिक्त, ते 'रेअर एंटरप्रायझेस' चे मालक होते. याशिवाय त्यांनी 'हंगामा डिजिटल मीडिया' आणि 'अ?पटेक' या कंपन्यांचे अध्यक्षपदही भूषवले. त्यांनी चित्रपट निर्मितीमध्येही हातभार लावला आणि 'इंग्लिश विंग्लिश', 'की अँड का' व 'चुप' यांसारख्या चित्रपटांची निर्मिती केली.

तसेच, २०२२ मध्ये त्यांनी 'आकासा एअर' ही स्वतःची विमान कंपनी सुरू केली होती. त्यांचे निधन १४ ऑगस्ट २०२२ रोजी वयाच्या ६२ व्या वर्षी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात झाले. त्यांच्या असामान्य कामगिरीमुळे, भारत सरकारने त्यांना या वर्षी मरणोत्तर पद्मश्री देऊन सन्मानित केले.

राकेश झुनझुनवाला यांच्या कमाईचा मुख्य स्त्रोत शेअर बाजार होता आणि या बाजाराने त्यांना यशाचे सर्व दरवाजे खुले केले. राकेश

## 5 हजार ते 40 हजार कोटींचा मालक होण्याचा प्रवास

झुनझुनवाला यांना शेअर मार्केटमध्ये आधीपासूनच रस होता. त्यांचे वडील घरी असताना त्यांच्या मित्रांसोबत नेहमी शेअर मार्केट बद्दल बोलायचे. शेअर मार्केटमध्ये त्यांना लहानपणापासूनच गुंतवणूक करायची इच्छा निर्माण झाली होती. परंतु त्यांच्या वडिलांनी सांगितले होते की पहिले पदवी घे मगच शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक कर, असा सल्ला त्यांनी दिला.

### टायटनने बिग बुल बनवले

त्यानंतरच्या तीन वर्षांत त्यांनी सुमारे अडीच कोटी रुपयांचा नफा कमावला. टाटा समूहाच्या आणखी एका कंपनीने त्याला 'बिगबुल' बनवले. २००३ मध्ये त्यांनी टाटा समूहाची कंपनी टायटनमध्ये पैसे गुंतवले. एकेकाळी झुनझुनवाला यांच्याकडे टायटनचे सुमारे ४.५ कोटी शेअर्स होते, ज्यांचे मूल्य ७००० कोटी रुपयांपेक्षा जास्त होते. झुनझुनवाला यांच्या पोर्टफोलिओमध्ये शेवटपर्यंत टाटाच्या शेअर्सचा मोठा हिस्सा होता.

## ‘एकच प्याला’ नाटकातील सुधाकरची भूमिका करणारे नटश्रेष्ठ : गणपतराव बोडस



गणपतराव बोडस हे मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ गायक नट होते. त्यांचा जन्म २ जुलै १८८० साली अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव गणेश गोविंद बोडस, पण गणपतराव याच नावाने ते ओळखले जात. शाळेत शिकत असताना ते हौशी नाट्यमंडळातून कामे करू लागले. १८९५ साली त्यांनी ‘किर्लोस्कर संगीत मंडळी’त प्रवेश केला. तेथे त्यांना पहिली काही वर्षे दुय्यम भूमिका विशेषत: स्त्रीभूमिका मिळाल्या, पण हळूहळू त्यांना सौभद्र नाटकात कृष्ण, शारदा नाटकात कांचनभट, मूकनायकात विक्रांत व मानापमानात लक्ष्मीधर अशा महत्त्वाच्या भूमिका मिळत गेल्या.त्यांनी १९१३ साली किर्लोस्कर मंडळी सोडून बालगंधर्व व गोविंद सदाशिव टेंबे यांच्या सहकार्याने ‘गंधर्व नाटक मंडळी’ची स्थापना केली. या कंपनीने सौभद्र, मृच्छकटिक, मानापमान, विद्याहरण इ. नाटकांव्यतिरिक्त संशयकल्लोळ, स्वयंवर, एकच प्याला, द्रौपदी इ. दर्जेदार नाटकेही रंगभूमीवर आणली. सुधाकर (एकच प्याला), लक्ष्मीधर (मानापमान), शकार (मृच्छकटिक), शिष्यवर (विद्याहरण) आणि फाल्गुनराव (संशयकल्लोळ) या गणपतरावांच्या भूमिका विशेष गाजल्या. १९३० सालानंतर मराठी रंगभूमीस उतरती कळा लागली व त्यानंतर अल्पावधीतच गणपतराव नाट्यव्यवसायातून निवृत्त झाले. पुढे त्यांनी एकदोन चित्रपटात भूमिका केल्या, परंतु चित्रपटसृष्टीत त्यांचे मन रमले नाही. नंतरच्या काळात त्यांनी प्रामुख्याने होतकरू नटांना मार्गदर्शन करण्याचेच काम केले. गणपतरावांना १९४० साली नाशिक येथे भरलेल्या एकतिसाव्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता. पुढे १९५६ साली नांदेड येथे भरलेल्या मराठवाडा नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्याच वर्षी त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्ली येथे संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार देण्यात आला. गणपतरावांनी चाळीस वर्षे मराठी रंगभूमी गाजविली व नाट्यसृष्टीतील अनेक बहुमान प्राप्त करून घेतले. अशा या मराठी रंगभूमीवरील श्रेष्ठ नटाचे २३ डिसेंबर १९६५ साली पुणे येथे निधन झाले.

## नागरिक गुलाम नाहीत! मुंबई उच्च न्यायालयाचा लोकशाहीला दिलासा देणारा निर्णय




लोकशाहीची खरी ताकद सत्तेत नसते, तर ती नागरिकांच्या स्वातंत्र्यात असते. सरकार बदलतात, पक्ष बदलतात, विचारधारा बदलतात; पण संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार बदलत नाहीत. म्हणूनच न्यायव्यवस्था ही केवळ कायद्याची नव्हे, तर लोकशाहीची अंतिम संरक्षक मानली जाते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जे. जामदार यांनी दिलेल्या अलीकडील निर्णयाने हीच घटनात्मक भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. हा निर्णय केवळ एका व्यक्तीच्या हद्दपारीचा नाही; तर नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, आंदोलनाच्या अधिकाराचा आणि संविधानाच्या सर्वोच्चत्वाचा पुनरुच्चार करणारा आहे. हे प्रकरण सय्यद अहमद अब्दुल वाहिद चौधरी यांच्या हद्दपारीशी संबंधित होते. सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (एअ्इ्घ) या नोंदणीकृत राजकीय पक्षाचे पदाधिकारी म्हणून त्यांनी केंद्र सरकारच्या काही निर्णयांविरोधात मोर्चे, आंदोलने आणि धरणे आयोजित केली होती. या आंदोलनांशी संबंधित प्रामुख्याने भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अंतर्गत गुन्हे दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ५६ अंतर्गत हद्दपारीची कारवाई करण्यात आली. मात्र न्यायालयाने संपूर्ण नोंदी तपासल्यानंतर स्पष्ट शब्दांत नमूद केले की, सरकारच्या निर्णयांविरोधात आंदोलन करणे, घोषणाबाजी करणे किंवा निषेध व्यक्त करणे यामुळेच एखाद्या व्यक्तीच्या हालचाली समाजासाठी धोकादायक ठरतात, असा कोणताही पुरावा प्रशासनाकडे नव्हता. त्यामुळे अधिकाऱ्यांनी नोंदवलेले तथाकथित Subjective Satisfaction कोणत्याही ठोस पुराव्याअभावी कायद्याच्या कसोटीवर टिकू शकत नाही. न्यायमूर्ती माधव जे. जामदार यांनी आपल्या लेखी निर्णयात स्पष्ट नमूद केले की, सरकारच्या काही निर्णयांना विरोध केल्यामुळेच एखाद्या नागरिकाला हद्दपार करणे हे संविधानाच्या कलम १९ अंतर्गत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. ही नोंद केवळ एका याचिकाकर्त्याला दिलासा देणारी नाही; तर भारतीय लोकशाहीच्या मूल्यांवर न्यायालयाने उमटवलेली ठाम मोहोर आहे.

या निर्णयासाठी न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या अनुराधा भसीन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या ऐतिहासिक निर्णयाचा आधार घेतला. त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, लोकशाहीतील वैध मतप्रदर्शन, आंदोलन किंवा तक्रारी दडपण्यासाठी कायद्याचा वापर करता येत नाही. गुजरात उच्च न्यायालयाच्या तत्सम निर्णयाचाही संदर्भ देत मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सरकारविरोधी भूमिका घेणे हा गुन्हा नाही. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जामदार यांनी केलेली काही तोंडी निरीक्षणेही देशभर चर्चेचा विषय ठरली. ‘सरकारच्या निर्णयांविरोधात नागरिकांनी आंदोलन करू नये का?’, ‘प्रत्येक आंदोलनावर गुन्हे दाखल करून नागरिकांना सरकारचे गुलाम बनवले जात आहे का?’, ‘‘भाजप सरकार मुर्दाबाद’ किंवा ‘अमित शाह मुर्दाबाद’ अशा घोषणा दिल्या म्हणून एखाद्याला हद्दपार कसे करता येईल?’असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. ही निरीक्षणे अंतिम लेखी आदेशाचा भाग नसली, तरी त्यातून व्यक्त झालेली घटनात्मक भूमिका लोकशाहीच्या आरोग्याबाबतची गंभीर चिंता व्यक्त करणारी आहे. लोकशाहीत सरकारवर टीका करणे म्हणजे राष्ट्रद्रोह नव्हे. सरकार म्हणजे राष्ट्र नाही आणि सत्ताधारी पक्ष म्हणजे संविधानही नाही. सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारण्याचा अधिकार जिवंत असेल, तरच लोकशाही जिवंत राहते. अन्यथा विरोधी मत दडपण्याची प्रवृत्ती हळूहळू लोकशाहीचा गळा घोटू लागते. हद्दपारी हा कायद्यातील अत्यंत कठोर आणि अपवादात्मक उपाय आहे. एखादी व्यक्ती समाजासाठी प्रत्यक्ष धोका निर्माण करत असल्यासच त्याचा वापर व्हावा, अशी कायद्याची अपेक्षा आहे. परंतु केवळ आंदोलनाचे आयोजन केले, घोषणा दिल्या किंवा शासनाच्या धोरणांचा विरोध केला.



प्रवीण बागडे
नागपूर,
मो. क्र. ९९२३६२०९१९

## महाराष्ट्राच्या आध्यात्मिक वैभवाचे शिखर : पंढरीची वारी

वेदप्रामाण्यवादी वैष्णव संप्रदायाच्या अग्रणी व प्रवृत्तीशी अविरोधी आणि निवृत्तीचा पुरस्कार करणारा वारकरी संप्रदाय हा अनुष्ठान निरपेक्ष आस्था प्रधान आहे. त्यामध्ये संतांनी सर्व व्यक्तिगत साधनेचे सार्वजनिकरण करून, भगवद्प्राप्तीच्या खडतर मार्गाला स्वतःच्या साधनसिद्धतेणे लोक सुलभ बनविले आहे. त्यामुळेच सर्व वारकरी काकड आरती पासून तर, हरिपाठापर्यंत प्रत्येक साधना हे सार्वजनिक स्वरूपाची करीत असल्याचे निदर्शनास येते. परिणामी वर्णाश्रमाच्या भिंती नैसर्गिकरित्या कोलमडून , त्याठिकाणी सामूहिक भक्ती करिता सामाजिक सामरस्याचे भव्य प्रांगण निर्माण झाले आहे. त्यावर अठरापगड जाती जमातीच्या आबालवृद्धांना कुठल्याही स्पृश्यास्पृस्य भेदभावाशिवाय ’ अवघी एकाचीच वीण ट तेथें कैंचे भिन्नभिन्न ट वेदपुरुष नारायण ट तेणें केला निवाडा टट’ या तुकोक्तीनुसार आपण एकाच ईश्वराचे लेकर आहोत या एकत्वाच्या बोधावर आरुढ होऊन, ते सर्व त्यावर मनसोक्त भजनानंदाचा सोहळा उपभोक्तांना दिसून येतात. त्यातही संपूर्ण विश्वालाच आपले घर मानुन , आपल्या श्रीगुरुंना विश्वात्मकदेव संबोधणाऱ्या विश्व माऊली भगवानश्री ज्ञानोबारायांनी ज्ञानोत्तर भक्तीप्रेमाचा पुरस्कार करीत, ज्ञान गिळून गोविंद गाण्या साठी भागवत धर्माच्या भक्तीची पताका स्वतःच्या खांद्यावर घेऊन ’ माझी जिवींची आवडी ट पंढरपुरा नेईन गुढी टट’ या वचनपूर्तीर्थ आरंभलेली पंढरीची वारी हे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक वैभवाचे शिखरच आहे.

परंपरा निर्माण करणे सोपे परंतु ते टिकविणे फारच कठीण असते. आज जगतात आरंभशूर लोकांचा भरणा भरपूर प्रमाणात असल्यामुळे, दिवसागणिक अनेकानेक परंपरा निर्माण होतात व निर्मात्याबरोबरच अनंतात विलीन होतात. परंतु ज्या परंपरेमागे निर्मात्याचे निस्सीम प्रेम, ती तहहयात चालविण्यासाठीची अहोरात्र धडपड व तत्पश्चात टिकविण्यासाठी त्यांचा आशीर्वाद असला तरच ती परंपरा चिरंतन होत असते. उपरोक्त तिन्ही गोष्टीचा माऊलीच्या पालखी सोहळ्यात अंतर्भाव असल्यामुळेच तो दिवसेंदिवस वाढतच असून, आज रोजी तो महाराष्ट्राच्या आध्यात्मिक , सामाजिक व सांस्कृतिक वैभवात भर घालीत आहे. हा सोहळा वारकऱ्यांच्या स्वयं-शिस्त , सर्वस्व समर्पण व परस्पर सहकार्याच्या माध्यमातून जागतिक आश्चर्याचा केंद्रबिंदू बनून, त्याच्या माध्यमातून निरंतरपणे नि:स्वार्थी , भगवद् निर्भर व निरुपद्रवी समाजाची अव्यहात निर्मिती होत आहे. त्यातूनच सज्जन शक्ती संघटित होत सक्रिय होऊन, विश्वबंधुत्वाचा संदेश केवळ कीर्तना-प्रवचनातून नव्हे तर, स्वतःच्या सर्वानुकरणीय आचरणातून संपूर्ण विश्वाला देत, माऊलींनी पसायदानाच्या माध्यमातून केलेली विश्वशांती ची प्रार्थना वास्तवात उतरवितांना दिसून येतात. या वारीत सरकारच्या दृष्टिकोनातून पूरक अशी आर्थिक उलाढाल , सुदृढ समाज व्यवस्थेकरिता वैचारिक आदान - प्रदान व संस्कृतीच्या दृष्टीने सांस्कृतिक संक्रमण ह्या तिन्ही गोष्टी अगदी सहजतेने होऊन , त्यातून सरकारचा उत्कर्ष , समाजाचे उत्थान व संस्कृतीचे अभिवृद्धी अर्थातच तिघांचेही सहज संवर्धन होत आहे. म्हणूनच या सोहळ्याच्या चिरंतनत्वाकरिता सरकार, समाज व संस्कृती रक्षकांनी सदैव सक्रिय राहून, तन-मन-धनाने सहकार्य केले पाहिजे.

वेदोपनिषदादि संस्कृत प्रचूर ग्रंथांचे तत्वज्ञान पचवून निर्माण झालेल्या, वारकरी संतांच्या लोकसुलभ मराठी वाङ्मयामुळे , या परंपरेची पाळमुळ शहरापासून गाव- खेड्यातील वाड्यावस्त्यांवरील तळागाळातील प्रत्येक सुज्ञ व अज्ञ आबाल वृद्धांपर्यंत खोलवर रुजलेली आहेत. त्यामुळेच शेकडो वर्षापासून परकीय आक्रांत्याच्या त्सुनामीत , अनेक आर्थिक संकटाच्या भूकंपात व प्रदीर्घ गुलामगिरीच्या वादळांनाही न जुमानता महाराष्ट्रीयन आध्यात्मिक वैभववाचा हा वृक्ष अजस्त्र अर्थात महाकाय झाला आहे. या अवाढव्य वृक्षांने येथील राजकीय सत्तेला स्थैर्य , समाज व्यवस्थेला बळकटी व संस्कृतीला भरभराटी प्रदान केली. त्याच्याच सावलीत खेळत - बागडत आम्ही लहानाची मोठी होत आहोत याचाच आम्हाला सार्थ स्वाभिमान आहे. त्या महाराष्ट्राच्या आध्यात्मिक वैभवाला नवसंजीवनी प्रदान करणाऱ्या भगवान श्री ज्ञानोबा- तुकोबारायांच्या पालखी सोहळा प्रस्थान तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भू वैकुंठ पंढरपूर येथे भगवान पंढरीनाथांच्या दर्शनार्थ येणाऱ्या सर्व साधूसंतांच्या पालखी सोहळ्यांच्या निमित्याने ’ प्रतिवर्षी पंढरपुरा ट येती महाद्वारा हरी भेटी टट’ त्या सर्व संतांच्या चरणी हे वाक्पुष्प समर्पित.



ज्ञानेश्वर महाराज वाघ
श्री संत वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर
श्री ज्ञानेश आश्रम वारी ( भैरवगढ )

## महाराष्ट्रातील पाऊस आणि पाणी: संस्कृती, अर्थव्यवस्था आणि आव्हाने

महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या अत्यंत वैविध्यपूर्ण प्रदेश आहे. राज्याची संस्कृती, अर्थव्यवस्था आणि एकूणच मानवी जीवन येथील पाऊस आणि पाण्याच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील पावसाचा मुख्य स्त्रोत 'नैऋत्य मोसमी वारे' हा असून, साधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यापासून ते सप्टेंबर अखेरपर्यंत मान्सूनचा काळ असतो. महाराष्ट्राची भौगोलिक रचना येथील पर्जन्यमानात मोठी विविधता निर्माण करते.

महाराष्ट्रातील पाऊस सर्व भागात सारखा पडत नाही. सह्याद्री पर्वत आणि अरबी समुद्राची किनारपट्टी यामुळे राज्याचे पर्जन्यमान प्रामुख्याने तीन भागांत विभागले गेले आहे. अरबी समुद्रावरून येणारे बाष्पयुक्त वारे सह्याद्री पर्वताला अडतात, त्यामुळे कोकण किनारपट्टी (मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) आणि महाबळेश्वर, गगनबावडा सारख्या घाटमाथ्यावर ३००० ते ५००० मिमीपेक्षा जास्त मुसळधार पाऊस पडतो. सह्याद्री ओलांडल्यानंतर वाऱ्यांमधील बाष्प कमी होते. त्यामुळे पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर आणि संपूर्ण मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर, लातूर, बीड) या भागात अतिशय कमी म्हणजे ५०० ते ७०० मिमी पाऊस पडतो. हा भाग अनेकदा दुष्काळाचा सामना करतो.

**विदर्भ (मध्यम ते जास्त पाऊस) :** पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा या जिल्ह्यांमध्ये बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या वाऱ्यांमुळे पुन्हा चांगला पाऊस (१००० ते १५०० मिमी) होतो. महाराष्ट्राला नद्यांचे मोठे वरदान लाभले आहे. गोदावरी, कृष्णा, भीमा, आणि तापी या राज्यामधून वाहणाऱ्या प्रमुख नद्या आहेत. सह्याद्रीतून उगम पावून पूर्वेकडे वाहणाऱ्या या नद्या महाराष्ट्राच्या शेतीची आणि पिण्याच्या पाण्याची गरज भागवतात. या नद्यांवर कोयना, जायकवाडी, उजनी यांसारखी मोठी धरणे बांधण्यात आली आहेत, जी उन्हाळ्यात पाण्याचा मुख्य आधार असतात. तसेच कोकणातील सावित्री, वसिष्टी या तीव्र गतीने वाहणाऱ्या नद्या पश्चिमेकडे अरबी समुद्राला जाऊन मिळतात.

### पाण्याचे महत्त्व आणि अर्थव्यवस्थेवरील परिणाम

महाराष्ट्र हा प्रामुख्याने कृषीप्रधान देश/राज्य आहे. येथील ६० टक्क्यांहून अधिक शेती थेट पावसाच्या पाण्यावर म्हणजेच 'जिरायती' अवलंबून आहे.

कृषी क्षेत्राचा कणा: वेळेवर आणि पुरेसा पाऊस झाल्यास खरीप (भात, कापूस, सोयाबीन) आणि रब्बी (ज्वारी, गहू, हरभरा) पिकांचे उत्तम उत्पादन होते. याउलट, पाऊस लांबल्यास किंवा खंड पडल्यास शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते.

शेतीव्यतिरिक्त मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या मोठ्या औद्योगिक शहरांना आणि महानगरांना वर्षभर पिण्याचा पाणीपुरवठा करण्यासाठी मान्सूनच्या पावसाची अत्यंत गरज असते. धरणे १०० टक्के भरणे हे राज्याच्या आर्थिक आरोग्याचे लक्षण मानले जाते.

**आव्हाने आणि जलव्यवस्थापन :** बदलत्या हवामानामुळे ( अलिकडच्या वर्षांत महाराष्ट्रातील पावसाचे स्वरूप लहरी झाले आहे. कधी कमी दिवसांत ढगफुटीसदृश अतिवृष्टी होते, तर कधी महिनाभर पाऊस गायब राहून कोरडा दुष्काळ पडतो.

## ‘केप व्हर्डे’ फिफा फुटबॉल विश्व चषकाच्या माध्यमातून जगाचे लक्ष वेधणार दे !


आज स्वातंत्र्य दिन

काबो व्हर्देचे प्रजासत्ताकचे प्रचलित नाव केप व्हर्डे आहे. हा पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळ १० बेटांच्या द्वीपसमूहावर वसलेला एक देश आहे. हा द्वीपसमूह अटलांटिक महासागरामध्ये पश्चिम आफ्रिकेच्या ५७० किमी पश्चिमेस स्थित आहे. १५व्या शतकापर्यंत पूर्णपणे निर्मनुष्य असलेला हा द्वीपसमूह १४६० साली पोर्तुगीजांनी शोधून काढला व तिथे वसाहत स्थापन केली. आफ्रिकेतील गुलामांना युरोपामध्ये नेणारी जहाजे येथे थांबा घेत असत. ह्यामुळे १७व्या व १८व्या शतकात केप व्हर्डेची भरभराट झाली. १९व्या शतकात गुलागिरीवर बंदी घालण्यात आल्यानंतर केप व्हर्डेची अर्थव्यवस्था खालावत गेली. १९७५ मध्ये पोर्तुगालने केप व्हर्डेला स्वातंत्र्य मंजूर केले. तेव्हापासून हा स्वातंत्र्य दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. सध्या केप व्हर्डे संयुक्त राष्ट्रे, आफ्रिकन संघ इत्यादी आंतरराष्ट्रीय संघटनांचा सदस्य आहे. २०१५ साली ५.२५ लाख लोकसंख्या असलेल्या केप व्हर्डेचे बहुसंख्य रहिवासी मिश्र युरोपीय व आफ्रिकन वंशाचे आहे. सध्या फिफा विश्वचषकाच्या माध्यमातून त्याने आपले नाव जगाच्या कान्याकोपऱ्यात पोहोचविले आहे.

केप व्हर्डे आफ्रिकेमधील प्रगत व संपूर्ण लोकशाही असलेल्या देशांपैकी एक आहे. येथे फारशी नैसर्गिक संपत्ती उपलब्ध नसल्यामुळे केप व्हर्डेची अर्थव्यवस्था पर्यटन व परकीय गुंतवणुकीवर अवलंबून आहे. २००७ साली केप व्हर्देला अविकसित देशांच्या गटातून विकसनशिल देशांच्या गटात बढती देण्यात आली. आफ्रिकेत हुकुमशाही व अराजकता वाढीस लागली असताना केप व्हर्देला येथील राजकीय व सामाजिक स्थैर्य व आर्थिक प्रगतीसाठी कौतुकाचे प्रमाणपत्र दिले जाते. २०१४ सालच्या लोकशाही निर्देशांकानुसार येथील लोकशाही जगात ३१व्या क्रमांकाची बळकट मानली जाते.काबो व्हेर्दे द्वीपसमूह मानवांनी १५ व्या शतकापर्यंत निर्जन होता, असे ऐतिहासिक कथा सांगतात ज्या कदाचित अचूक नसतील, जेव्हा पोर्तुगीज संशोधकांनी या द्विपांना वसाहती दिल्या, उष्णकटिबंधीय क्षेत्रातील पहिले युरोपियन वसती स्थापन केले. त्याच्या सामरिक स्थानामुळे, काबो व्हेर्दे १६ व्या आणि १७ व्या शतकांत ट्रान्सअटलांटिक दास व्यापारात एक महत्त्वपूर्ण केंद्र बनले. या कालावधीत द्वीपांनी आर्थिक वाढ अनुभवली, जी दास व्यापाराच्या भूमिकेमुळे प्रोत्साहित झाली, ज्यामुळे व्यापारी, खाजगी नौकाधिपती आणि समुद्रदस्युही आकर्षित झाले. १९ व्या शतकात ब्रिटिश साम्राज्याने अटलांटिक दास व्यापाराचे दमन केल्याने याच्या अर्थव्यवस्थेमध्ये घट झाली, आणि त्या काळात अनेक जण स्थलांतरित झाले.

### व्युत्पत्ती

हा देश सेनेगली किनाऱ्यावरील कॅप-व्हर्ट बेटावरून नाव घेतले आहे. कॅप-व्हर्ट हे नाव पोर्तुगीज भाषेतून 'कॅबो वर्डे' ('हिरवे कॅप') हे नाव आले आहे, जे पोर्तुगीज अन्वेषकांनी १४४४ साली कॅपला दिले होते, काही वर्षांनंतर जेव्हा ते बेटांचा शोध घेण्यासाठी आले होते. २४ ऑक्टोबर २०१३ रोजी, देशाच्या संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी याबाबत माहिती दिली की इतर देशांनी कॅप वर्डे किंवा कॅबो वर्डे या नावाचे अन्य भाषांतर अधिकृत नाव म्हणून वापरू नये, सर्व देशांनी या देशाचे अधिकृत नाव म्हणून 'गणतंत्र कॅबो वर्डे' वापरणे आवश्यक आहे. इंग्रजी बोलणाऱ्यांनी या द्वीपसमूहासाठी आणि १९७५ च्या स्वातंत्र्यानंतर या देशासाठी कॅप वर्डे हे नाव वापरले आहे. २०१३ मध्ये, कॅप वर्डियन सरकारने ठरवले की ते अधिकृत हेतूंसाठी पोर्तुगीज नाव कॅबो वर्डे वापरणार आहे, संयुक्त राष्ट्रांमध्ये, इंग्रजीत बोलताना किंवा लेखन करताना देखील.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# नव्या दुकानांच्या खरेदीचा छंद; सीईओ लक्ष देतील ?

## झेडपी बांधकाम विभागाचा कारभार चव्हाट्यावर ■ 'भोकर-काळेगाव' रस्त्याची पहिल्याच पावसात दैना

प्रतिनिधी ५ जुलै

**अकोला :** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील कथित भ्रष्टाचाराची पाळेमुळे आता थेट ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेतून समोर येऊ लागली आहेत. हिवरखेडनजीकच्या भोकर ते काळेगाव या रस्त्याचे काम याचे उत्तम उदाहरण असून, पहिल्याच पावसात या दीड कोटींच्या कामाचे 'तीन-तेरा' वाजले आहेत. या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गुणवत्ता तपासणीचे आदेश द्यावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. ग्रामीण भागात दळणवळणासाठी रस्ते हाच मुख्य दुवा असतो. मात्र, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांना सध्या 'नवे



रस्त्यांच्या 'मातीकामा'तून अधिकाऱ्यांना लागला

दुकाने विकत घेण्याचा' सुबक छंद जडला असल्याची चर्चा रंगत आहे. या काळ्या संपत्तीतून उभ्या राहिलेल्या छंदापायी ग्रामीण भागातील रस्त्यांची मात्र पूर्ण 'माती' झाली आहे. निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांबाबत तक्रार करूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. भोकर-काळेगाव रस्त्याच्या कामात डांबराऐवजी केवळ मातीचाच वापर जास्त झाल्याचे पहिल्याच पावसाने दाखवून दिले. तब्बल दीड कोटी रुपये खर्च करून तयार केलेला हा रस्ता पहिल्याच पावसात वाहून गेल्याने काळेगाव-भोकर परिसरातील शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग भ्रष्टाचाराने पोखरला गेल्याचा दावा आता उघडपणे केला जात आहे. त्यामुळे अकोला जिल्हा परिषदेचे नवे सीईओ या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देतील का? निकृष्ट कामांची चौकशी करून संबंधित भ्रष्ट अधिकारी आणि ठेकेदारांवर कडक कारवाईचे पाऊल उचलणार का? याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### रस्त्याच्या बाजुच्या मातीचे उत्खनन

या रस्त्याच्या बाजुच्या मातीचे उत्खनन करत मोठ मोठाले खड्डे करण्यात आले आहे. यातील काही खड्डे हे दहा ते चौदा फुटाचे आहे. यात कोणाच्या वाहनाचा अपघात झाल्यास त्यात बुडून कोणाचा मृत्यू झाल्यास जबाबदार कोण, त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या शेतात रस्त्याच्या बाजुच्या उत्खननाने झालेल्या खड्डयांनी पिकाचे नुकसान होत आहे. हा सर्व गंभीर प्रकार असून जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यावर गुन्हा दाखल करण्याची गरज आहे.

### अपघाताची चौकशी करण्याची गरज !

काही दिवसांपूर्वी बांधकाम विभागाचे अधिकारी आणि ठेकेदाराच्या गाडीला झालेल्या अपघाताची सखोल चौकशी करण्याची गरज आता व्यक्त केली जात आहे. या अपघातामागे आणि अधिकारी-ठेकेदारांच्या 'अति-जिव्हाळ्याच्या' संबंधांमागे नक्की कोणते अर्थकारण दडले आहे, याचा शोध घेणे गरजेचे झाले आहे. या अपघातानंतर राजकीय दबाव आणणारे कोण याचा लवकर खुलासा होणार असून गुन्हे दाखल का झाले नाही याची माहिती समोर येईल.

# जिल्ह्यातील जल प्रकल्प पाण्यासाठी आसुसलेले



प्रतिनिधी ५ जुलै

**अकोला :** पावसाळा लांबल्यामुळे जिल्ह्यातील जल प्रकल्प देखील तहानलेले आहेत. वान प्रकल्पात त्यातल्या त्यात समाधानकारक स्थिती आहे परंतु अन्य प्रकल्पांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. 04 जुलै रोजी काटेपूर्णा प्रकल्पात पातळी 340.80 मी, टक्केवारी 19.24 %. वान प्रकल्प पातळी 398.24 मी., टक्केवारी 40.94%, मोर्णा प्रकल्प ता. पातूर पातळी 362.30 मी., टक्केवारी 43.30%, निर्गुणा प्रकल्प ता. पातूर पातळी 383.20 मी., टक्केवारी 17.30 %, उमा प्रकल्प ता, मूर्तिजापूर पातळी 337.65 मी., टक्केवारी. 3.34 %, दगडपारवा प्रकल्प जलाशय पातळी -315.40 मीटर, टक्केवारी - 41.41% आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील पाणी पातळीकडे अकोला शहरासह परिसराचे लक्ष आहे. कारण अकोलेकरांना पेयजल काटेपूर्णा प्रकल्पातून उपलब्ध होते. वाशिम जिल्ह्यात काटा भागात चांगला पाऊस झाला तर त्याचा फायदा काटेपूर्णा प्रकल्पातील जल पातळी वाढीत होतो. परंतु सध्या तिकडे देखील म्हणावा तसा पाऊस नाही. याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# अनियंत्रित वाहतुकीच्या चक्रात अकोलेकर



ना सिग्नल ना वाहतूक पोलिस

प्रतिनिधी ५ जुलै

**अकोला :** शहरातील वाहतूक व्यवस्था कधी कधी रामभरोसे दिसते. मुख्य चौकातून वाहनांची ये जा सुरू असते. परंतु ना सिग्नल सुरू असतात ना वाहतूक पोलिस ड्युटीवर असतो. शनिवारी हा प्रकार मदनलाल धिंग्रा चौकात पाहायला मिळला.

एकीकडे पावसाची रिमझिम सुरू होती. आणि रहदारी आपल्या पद्धतीने चालली होती. शहरातील दुचाकी चालक असो की ऑटोरिक्षा चालक प्रत्येकाला घाई झालेली दिसते. आडवी तिडवी कसेही चालवून पुढे जाण्यात काही वाहन चालक धन्यता मानतात. यातून वाद, अपघात होतात. परंतु त्याचे सोयरसुतक नसते. नियमबाह्यपणे जड वाहनांची वाहतूक सुरू असते. शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारावी म्हणून प्रयत्न सुरू आहेत. मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवले जात आहे. परंतु अद्याप या बाबतीत मोठा पल्ला गाठायचा आहे असे दिसते. वाहतुकीचे नियम कटाक्षाने पाळले जात नाही तसेच स्वयंशिस्त जोवर लागत नाही तोपर्यंत सुधारणा अशक्य वाटते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

प्रतिनिधी ५ जुलै

**खामगाव :** तालुक्यातील पळशी रस्त्यावरील बोरी अडगाव शिवारातील पुलावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी जगन काशीराम सोनवणे (५७, मूळ रा. कुन्हा काकोडा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव, सध्या रा. गणेशपूर, ता. खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला. २९ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजेपूर्वी बोरी अडगाव शिवारातील पुलावर अज्ञात वाहन चालकाने भरधाव व निष्काळजीने वाहन चालवत सोना जगन सोनवने (२९) यांच्या विनानोंदणीच्या नव्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सोना सोनवने यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१ तसेच मोटार वाहन अधिनियमाच्या कलम १३४ व १७७अंतर्गत अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माजी सैनिकांच्या मूलभूत सुविधांसाठी माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे यांचे पंतप्रधानांना निवेदन




प्रतिनिधी ५ जुलै

**मूर्तिजापूर :** शहरातील माजी सैनिकांच्या वसाहतीतील प्रलंबित मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठविले आहे. निवेदनात माजी सैनिक वसाहतीतील विविध समस्यांकडे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. वसाहतीत अंतर्गत रस्त्यांची उभारणी, सुमारे ६० घरांसाठी स्वतंत्र पाणीपुरवठा पाइपलाइन टाकणे, वीजपुरवठ्याची योग्य व्यवस्था करणे तसेच माजी सैनिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात येणाऱ्या प्रवेशद्वारासाठी व त्यांचे कार्यालय पक्के बांधकाम करिता सुमारे २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. देशसेवेसाठी आयुष्य वाहिलेल्या माजी सैनिकांना आवश्यक नागरी सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क असून शासनाने या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा द्वारकाप्रसाद दुबे यांनी व्यक्त केली आहे.

# भारत विद्यालय समोर रस्त्यावर चिखल, साचले तळे

## भूमिगतच्या खोदकामाने वाढवल्या अडचणी



**अकोला :** शालेय विद्यार्थी तसेच नागरिकांना भारत विद्यालय समोरील रस्त्यामुळे अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. भूमिगत योजनेसाठी हा रस्ता खोदला होता. परंतु माती तशीच राहिली. रस्ता व्यवस्थित केला नाही. त्यामुळे आता या भागात चालणे अशक्य झाले आहे. विद्यार्थी तसेच नागरिकांना रोज कसरत करावी लागत आहे. मुरूम टाकून तात्पुरती दुरूस्ती करावी अशी मागणी आहे.

हनुमान मंदिर ते भारत विद्यालय आणि हातेकर निवासकडे जाणारा अशा दोन्ही रस्त्यावर चिखल झाला तसेच पाणी साचले आहे. पावसाळ्यात शहरातील अनेक रस्त्यावर ही समस्या निर्माण झाली आहे. तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे.

# पावसा अभावी भाज्यांचे दर कडाडले



प्रतिनिधी ५ जुलै

**अकोला :** पाऊस पाण्याचा भाजीपाल्यावर देखील परिणाम झालेला दिसतो. काही दिवसांत भाज्यांचे दर वाढलेले दिसतात. सरासरी ८० रुपये किलो प्रमाणे भाज्या विकत घ्याव्या लागत आहेत तर काही भाज्यांचे भाव १०० ते १२० रुपये किलो पर्यंत पोहोचले आहेत.

कांदे बटाटे त्यातल्या त्यात स्वस्त असून ५० रुपये किलो दर आहे. तर पालक, भेंडी, टोमॅटो, चाकवत, फुलकोबी, पत्ताकोबी ८० रुपये किलो तर गवार शेंग, ढेमसे, फणस १०० ते १२० रुपये किलो नुसार बाजारात उपलब्ध आहे. मुख्य बाजार आणि हद्दवाढ भागातील दरामध्ये पाच दहा रुपयांचा फरक पडतो. त्या भागातील लोकांना दोन पैसे जादा मोजण्याशिवाय पर्याय नसतो. पाऊस अनियमित स्वरूपाचा असल्याने त्याचा परिणाम भाज्यांच्या उगवणीवर झाला आहे. त्यामुळे दर वाढले आहे. आवक वाढली की दर नियंत्रणात राहतील असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. सध्या तरी ग्राहकांना चढ्या दराने भाजीपाला खरेदी कराव्या लागत आहेत.

# जीवघेण्या हल्ल्यातील आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ५ जुलै



**यवतमाळ :** शहरातील जीवघेण्या हल्ल्याच्या प्रकरणातील गेल्या दीड महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला यवतमाळ शहर पोलिसांनी तळेगाव दशासर येथून अटक केली. सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने व गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात १४ मे रोजी जबीन कुरेशी आसिफ कुरेशी यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्यांचा भाचा शेख कैस बिराम कुरेशी याच्यावर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी अफजल खान उर्फ दाऊद आणि आदिल खान यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) व ३(५) अन्वये गुन्हा क्रमांक ३७८/२०२६ दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असून त्यातील आरोपी आदिल खान अफसर खान हा घटनेनंतर फरार झाला होता. दरम्यान, संबंधित आरोपी तळेगाव दशासर येथे लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सायबर सेलच्या मदतीने तांत्रिक तपास आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला. तळेगाव दशासर येथील बसस्थानक परिसरातून रात्री सुमारे सात वाजताच्या सुमारास आरोपीला ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेला आदिल खान अफसर खान हा पांढरकवडा रोडवरील रुग्णालय सोसायटी परिसरातील रहिवासी आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुजाता मनवर करीत आहेत.

# अवैधरित्या चार चाकी वाहनांमध्ये विदेशी दारुची वाहतूक करणाऱ्या दोघांवर कारवाई



**मंगरूळपीर :** तालुक्यातील मोटसावंगी रोडवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने अवैध रित्या दारूची वाहतूक करणाऱ्या वर कारवाई केली आहे.यामध्ये 1चार चाकी वाहन आणि विदेशी दारू साठा असा लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलं आहे .वाशिम जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने अवैध दारू वाहतुकीविरोधात धाड सत्र सुरू केले आहे.दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या गोपनीय माहिती वरून मंगरुळपीर तालुक्यातील मोटसांगवी रोडवर सापळा रचण्यात आला.समोरून येणाऱ्या एका चार चाकी वाहनाला थांबवून झडती घेतली असता,त्यामध्ये गोवा राज्य निर्मित विदेशी दारुचा अवैध दारू साठा आढळून आला.या प्रकरणी दोन जणांसह एक चारचाकी वाहन ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत विदेशी दारूचा साठा आणि वाहन असा एकूण ५ लाख ८७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क विभाग करीत आहे.

# दस्तूर नगर – जेवड नगर मार्गावरील निष्काळजीपणामुळे भीषण अपघात

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती:** अमरावती शहरातील जेवड नगर – दस्तूर नगर आशा कॉलनी आणि पोस्टमन कॉलनी ला जोडणारा पुल या मार्गावरील नाल्यावर अद्यापही कायमस्वरूपी पूल बांधण्यात आलेला नाही. संबंधित ठिकाणी केवळ कच्चा मुरूम टाकून तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. आज सकाळी याच मार्गावरून जात असलेली शाळेची व्हॅन थोडक्यात मोठ्या अपघातातून बचावली. त्यानंतरही प्रशासनाने कोणतीही तातडीची उपाययोजना केली नाही. याच दिवशी रात्री मुगाने भरलेली एक इंट्रा (Intra) मालवाहू गाडी या ठिकाणी पलटी झाली.

या अपघातामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा या ठिकाणी कायमस्वरूपी पूल उभारण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना न झाल्याने वारंवार अपघात घडत आहेत. स्थानिक नागरिकांची मागणी : संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन नाल्यावर मजबूत व सुरक्षित पूल उभारावा, जेणेकरून भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

# पोलिसांनी एमडी ड्रग्स केले नष्ट

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती:** शहर पोलीस आयुक्तालयातील पकडण्यात आलेला गांजा व एमडी मुद्देमाल नाश करण्यात आला अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस स्टेशनला एन.डी.पी.एस अ‍ॅक्ट १९८५ अंतर्गत दाखल असलेल्या १२ गुन्हयातील जप्त करण्यात आलेला १४९.०२६ किलोग्राम गांजा आणि ६९.५४ ग्रॅ. एम.डी. असा एकुण कि.अं. ३३,२८,२२० (तेहत्तीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे वीस रूपये) चा अंमली पदार्थाचा मुद्देमाल दिनांक ०४.०७.२०२६ रोजी केंद्रीय गोडावून पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती येथुन महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड, बुटीबोरी एमआयडीसी, जि. नागपुर या ठिकाणी नेवुन इंसीनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला. यामध्ये अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील सन १९९६ पासुन दाखल असलेल्या १) पोलीस ठाणे नागपुरी गेट येथील २ केसेस, पोलीस ठाणे बडनेरा येथील १ केस, पोलीस ठाणे गाडगेनगर येथील ४ केसेस, पोलीस ठाणे नांदगाव पेठ येथील १ केस पोलीस ठाणे फ्रेजरपुरा येथील ३ केसेस आणि पोलीस ठाणे राजापेठ येथील १ केस याप्रमाणे एकुण १२ केसेस समाविष्ट होत्या. सदर केसेसचा न्यायालयीन निकाल लागलेला असल्याने सदर केसेसमधील गांजा व एमडी मुद्देमाल नाश करण्याकरीता राकेश ओला, पोलीस आयुक्त अमरावती शहर यांच्या अध्यक्षतेखाली शाम घुगे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र २ तसेच प्रांजली सोनवणे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) अशी त्रीसदस्यीय ड्रग डीस्पोजल कमीटी स्थापण करण्यात आली होती. सदर ड्रग डीस्पोजल कमीटीच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचेकडून सदर गांजा व एमडी मुद्देमाल नाश करण्याकरीता परवानगी प्राप्त करण्यात आली असता त्यांनी महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड, बुटीबोरी एमआयडीसी, जि. नागपुर या ठिकाणी सदर गांजा व एमडी मुद्देमाल नाश करण्याची परवानगी दिली होती. त्याप्रमाणे दि. ०४.०७.२०२६ रोजी सदर संपुर्ण १२ केसेसमधील गांजा व एमडी मुद्देमाल महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड, बुटीबोरी एमआयडीसी, जि. नागपुर या ठिकाणी नेवुन ड्रग डीस्पोजल कमीटी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड चे मॅनेजर, दोन पंच व आणि पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांचे समक्ष कंपनीमध्ये इंसीनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला. सदरची कार्यवाही राकेश ओला, पोलीस आयुक्त अमरावती शहर यांच्या प्रमुख उपस्थीतीत शाम घुगे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. २ तसेच प्रांजली सोनवणे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श अतुल वर, स.पो. नि. योगेश इंगळे, स.पो.उपनि. कैलास सानप, सुधीर गुडधे, पो.कॉ. गोविंद धनव, निलेश वंजारी, पो.हे. कॉ निलेश पोकळे, पो. कॉ. उमेश धोटे यांनी केली.

# अकोल्याच्या ज़िनल माटलिया यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

प्रतिनिधी ५ जुलै

**अकोला :** दोन्ही हातांनी एकाच वेळी गेंदी काढल्याने अकोल्याच्या जिनल गाटलिया यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. दुहेरी यश त्यांनी प्राप्त करीत त्यांनी अकोल्याला लौकिक प्राप्त करून दिला आहे.



स्थानिक मलकापूर रोडवरील गजानन पॅलेस मधील रहिवासी जिनल शैलेश माटलिया यांनी अनोख्या कलेच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिनल माटलिया यांनी दोन्ही हातांचा एकाच वेळी वापर करून आपल्या आईच्याच दोन्ही तळहातांवर अवघ्या ५ मिनिटे ५० सेकंदांत अरेबिक मेंदीची आकर्षक रचना साकारत नवा विक्रम स्थापन केला. या अभूतपूर्व कामगिरीमुळे त्यांनी केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण अकोला शहराचे नाव राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

सातत्यपूर्ण मेहनत आणि आपल्या कलेवरील निष्ठा यांची साथ मिळाली तर यश नक्कीच मिळते. माझ्या कलेमुळे मला हा अविस्मरणीय सन्गान गिळाल्याचा गला गनापासून आनंद आहे. हा सन्गान गाझ्यासाठी या क्षेत्रात आणखी परिश्रम करण्याची प्रेरणा देणारा आहे. जिनल माटलिया यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वच स्तरांतून त्यांचे कौतूक करण्यात येत आहे. त्यांच्या या कामगिरीचा गौरव अकोलेकरांसाठी अभिमानस्पद आहे.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. ५ जुलै २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## पोलीस स्टेशन मध्ये तक्रार निवारण केंद्र

**अमरावती :** निकेतन कदम, पोलीस अधीक्षक ग्रामीण यांनी अमरावती ग्रामीण पोलीस घटकामध्ये सर्व पोलीस स्टेशन मध्ये प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिवस राबविण्याबाबत सुचणा देण्यात आलेले आहे या निमीत्ताने सर्व पोलीस स्टेशन मध्ये प्राप्त होणारे नागरीकांच्या तक्रारी ऐकुण तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सर्व ठाणेदार यांना आदेशीत करण्यात आले आहे. त्यानुसार आज ०४/०७/२०२६ रोजी निकेतन कदम, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण हे पोलीस स्टेशन चिखलदरा तसेच दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण हे पोलीस स्टेशन पन्नोट येथे प्रत्यक्ष उपस्थित राहीले तसेच संबंधीत विभागाचे उप-विभागीय पोलीस अधिकारी त्यांचे अधिनिस्त पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहुन तसेच सर्व पोलीस स्टेशनचे ठाणेदार हे आप आपले पोलीस स्टेशन मध्ये तक्रार निवारण दिवशी नागरीकांच्या एकुण २१० तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.


# शहरापासून 12 किमी दूर मेडिकल कॉलेज चालविणे भौतिकदृष्ट्या अडचणीचे होईल- आ. संजय खोडके

### जीएमसी जागेच्या फेरविचार संदर्भात मुख्यमंत्र्यांच्या समितीपुढे वस्तुस्थिती मांडा - सभापती राम शिंदे

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती :** अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी शहरापासून १२ किलोमीटर लांब अंतरावर प्रस्तावित केलेली मौजे आलियाबाद येथील जागा ही भौतिकदृष्ट्या अडचणीची होणार आहे. याबाबत फेरविचार करण्याची मागणी वारंवार अधिवेशनातून होत असतांना वैद्यकीय शिक्षण विभाग हा तीनवर्षापूर्वी मुख्यमंत्रीमहोदयांच्या समितीचा हवाला देत आहे. आता हि जागा आयडेंटिफाइट फॉरेस्ट असतांना निदान आता तरी वैद्यकीय शिक्षण विभाग डिपार्टमेंट म्हणून त्याला विरोध करणार का ? असा प्रश्न आ. संजय खोडके यांनी अधिवेशनात उपस्थित केला.

अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे शहरापासून १२ किलोमीटर लांब अंतरावर मौजे आलियाबाद येथे जागा निवडण्यात आली. ५००-६०० कोटी रुपये खर्च करून ते रुग्णालय उभारण्यात येईल. मात्र त्याला ओपीडी उपलब्ध होणार नसल्याने ते रुग्णालय चालणे भौतिकदृष्ट्या शक्य होणार नाही. त्यामुळे याला डिपार्टमेंट म्हणून वैद्यकीय शिक्षण विभागाने पॉलिसी म्हणून विरोध करायला पाहिजे, त्यासंदर्भातील विषय व वस्तुस्थिती मुख्यमंत्री महोदयांच्या समितीपुढे मांडायला पाहिजे. डिपार्टमेंट ने ठरविले कि , आम्हाला हायकोर्टात जायचे आहे , तर त्यांनी तशी परवानगी मागायला पाहिजे. मात्र वैद्यकीय शिक्षण विभाग केवळ तीन वर्षापूर्वीच्या



उपसमितीने निवडलेल्या जागेचा हवाला देत आहे. आता मौजे आलियाबाद येथील जागा वनविभागाच्या अखत्यारीत आली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या परवानगीसाठी विलंब लागून कायदेशीर मान्यता व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे अमरावती येथील जीएमसीच्या जागेसंदर्भात फेरविचार करावा ? तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाने एक डिपार्टमेंट या नात्याने प्रस्तावित मौजे आलियाबाद येथील जागा भौतिकदृष्ट्या शक्य नसल्याचा अभिप्राय देऊन समितीपुढे ठेवण्याचा निर्णय घेणार का ? असा प्रश्न सुद्धा आ. संजय खोडके यांनी सभागृहात उपस्थित केला. यावर पीठासीन सभापती मा.राम शिंदे यांनी अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मौजे अलियाबाद येथील जागेबाबत फेरविचार करण्यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने सर्व वस्तुस्थिती ही मुख्यमंत्रीमहोदयांच्या समितीपुढे ठेवून त्यांचा निदर्शनास आणून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

**इर्विन रुग्णालय जीएमसीकडे हस्तांतरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी**

दरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या ५०० खाटांच्या संलग्न रुग्णालयाच्या हस्तांतरणाचा मुद्दाही आमदार संजय खोडके यांनी उपस्थित केला. राज्य शासनाने आदेश दिल्यानंतरही व तीन वर्षापूर्वीच इर्विन रुग्णालय हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी हस्तांतरित करण्याचा करार झाला असून सुद्धा जीएमसीचे अधिष्ठाता - डॉ. नंदकिशोर राऊत यांच्याकडून ताबा मिळविण्यासाठी आवश्यक प्रयत्न होत नसल्याने इर्विन रुग्णालयाच्या हस्तांतरणास विलंब होत आहे.

# अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारास पोलिसांनी लालखडी येथून घेतले ताब्यात

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती :** गुन्हे शाखा, अमरावती शहर येथील अधिकारी व अंमलदार हे अवैध धंदे तसेच अवैध शस्त्रे बाळगणारे यांचेवर कारवाई करणे कामी आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदारा कडून गोपनिय माहिती प्राप्त झाली की, अब्दुल मौसिन उर्फ सदू नावाचा गुन्हेगार इसम अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगून लालखडी परिसरात फिरत आहे. सदरची माहीती ही खात्रीशीर असल्याने माहिती प्रमाणे गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी माहिती प्रमाणे लालखडी येथे जावून, सापळा रचून अब्दुल मौसिन उर्फ सदू शोध घेत असतांना अब्दुल मौसिन उर्फ सदू समोरुन येतांना दिसला त्यास घेराव घालून ताब्यात घेतले असता त्याचे कमरेला पाठीमागील बाजूस पॅन्टमध्ये एक लोखंडी पिस्टल खोचलेली मिळून



आल्याने सदर अग्निशस्त्र ताब्यात घेवून त्याची मॅगझीन काढून निरीक्षण केले असता त्यात एक जिवंत काडतूस मिळून आले. सदर इसमाकडून एक लोखंडी पिस्टल मॅगझीनसह व एक जिवंत राउंड जप्त करण्यात आले. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाई करीता पो.स्टे. नागपूरीगेट यांचे ताब्यात देण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव : अब्दुल मौसिन उर्फ सदु अब्दुल रौउफ, वय २९ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, राहणार - बिस्मिला नगर, लालखडी, अमरावती, जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचे वर्णन - कि. अंदाने ३०,०००/-रु.:- एक लोखंडी पिस्टल मॅगझीनसह कि. अंदाजे २०००/-रु. :- एक जिवंत काडतूस असा एकूण अंदाने ३२,०००/-रु. मुद्देमाल सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला . पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ ०१), मा. श्रीमती प्रांजली सोनावणे मॅडम. पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), मा. सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) श्री. कैलास फुंडकर सा., तसेच सहायक पोलीस आयुक्त, (गाडगेनगर विभाग) निलेश ब्राम्हणे सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. दिनेश दहातोंडे सा., यांनी केलेली आहे.

# पोलीस स्टेशन खोलापुर येथील ग्राम नावेड येथे देशी दारू साठा जप्त

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती :** पोलीस स्टेशन खोलापुर येथील ग्राम नावेड येथे देशी दारू साठा जप्त केला. पोलीस स्टेशन खोलापुर कडुन कारवाई केली. आरोपी नाव राहुल लालजी थोरात वय ३४ वर्ष रा. वाठोडा शुक्लेश्वर ता. भातकुली (फरार) रोषन बंडु भटकर रा. वाठोडा शुक्लेश्वर ता भातकुली, वाठोडा शुक्लेश्वर येथील देशी दारू लायसन्स दुकानदार मालक असे आहे. पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी अवैध देशी दारू वाहतुक/विक्री करणा-या विरूध्द कारवाई करण्याच्या सुचना सर्व ठाणेदार यांना निर्गमीत केल्या होत्या. ३ जुले रोजी पोलीस स्टेशन खोलापुर येथे दारू वाहतुकी बाबत मिळालेल्या गुप्त माहीती वरून ग्राम नावेड येथे नकाबंदी केली असता ग्राम वाठोडा शुक्लेश्वर येथुन दोन इसम हे मोटार सायकवर अवैदयरित्या विनापरवाना भरधाव वेगाने इतराचे जिवीतास धोका निर्मान होईल अशा प्रकारे देशी दारू ची वाहतुक करताना दिसले त्यांना थांबवले असता त्या पैकी मागे बसनारा एक इसम हा पळून गेला. मोटार सायकल चालवणारा इसम यास ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल लालजी थोरात वय ३४ वर्ष रा. वाठोडा शुक्लेश्वर ता. भातकुली, असे सांगीतले. त्याचे मोटार सायकलवर असलेल्या तिन गोनपाटाचे पोत्याची झडती घेतली असता त्या मध्ये ७ पेटया देशी दारू प्रत्येक पेटीत १८० मीलीच्या ४८ नग देशी दारू बॉटल ज्याची कि. ३८४० रू व सात पेटीची एकुन किंमत २६,८८० रू व मोटार सायकल बजाज पलसर क्र ३५ २७/ ॐ ८४५७ लाल काळया रंगाची कि.अं. १,२०,००० रू असा एकुन १,४६,८८० रू चा मुददेमाल मिळुन आला. मोटार सायकल चालक राहुल लालजी थोरात वय ३४ वर्ष रा. वाठोडा शुक्लेश्वर ता.भ ता. भातकुली, , व व पळुन जानारा रोषन बंडु भटकर रा. वाठोडा शुक्लेश्वर याचेवर कलम २८१,१२५, ३(५) बिएनएस सहकलम ६५(अ), ६५(ई), महा. दा. का. प्रमाणे व वाठोडा शुक्लेश्वर येथील लायसन्स देशी दारू दुकानदार मालक याने विहीत परवान्यापेक्षा जास्त देशी दारू विक्री करून लायसन्स / परवाना मधील अटी व शर्तीचा तसेच शासन निर्णयातील नियमांचा भंग केला वरून त्याचेवर ८२,८३ (ब) महा. दा. का. प्रमाणे कायदेशीर कार्यवाही करण्यात आली

# पंचायत समिती व तालुका कृषी धारणीद्वारे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

प्रतिनिधी ५ जुलै

**धारणी:** पंचायत समिती धारणी व तालुका कृषी अधिकारी कार्यालय धारणी यांचे संयुक्त विद्यमाने कृषी दिन या कार्यक्रमाचे आयोजन क्रांतीसुर्य बिरसा मुंडा सभागृह पंचायत समिती धारणी येथे आयोजित करण्यात आला होता.या दिवशी हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री आदरणीय कै. वसंतरावजी नाईक यांची जयंती.यांच्या कृषि विषयक कार्याचे स्मरण व सन्मान त्याचबरोबर जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी राजा यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे सर्व महाराष्ट्र भर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.कार्यक्रमाला पंचायत समिती चे गटविकास अधिकारी श्री रजत कावळे कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले, सोबतच प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका कृषी अधिकारी उमेश जाधव उपस्थित होते, त्याचबरोबर पंचायत समिती चे कृषि अधिकारी कामाजी ठोंबरे, जिस्कार सहा. प्रशासन अधिकारी, अविनाश थोरात कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सुधाकर उमक विस्तार अधिकारी पंचायत हे सर्व मान्यवर म्हणून उपस्थित होते.सोबतच तालुक्यातील प्रगतशील शेतकरी यांचा शाल श्रीफळ पुष्प गुच्छ व एक झाड देऊन सन्मान करून प्रोत्साहन देण्यात आले यामध्ये नामदेव बेड्याजी तोटे रा. घुटी सुभाष भालेराव निकम रा. बाबंदा सुहास माधवराव सालफळे रा. दिया या प्रगतशील शेतकरी व शेतीच्या योगदानासाठी सन्मान करण्यात आला, कार्यक्रमाचे अध्यक्ष गटविकास अधिकारी श्री रजत कावळे यांनी कृषी शिक्षण हे नोकरी पुरते मर्यादित न राहता तरुणांनी शेती व शेतीपूरक व्यवसाय सुद्धा करण्याकडे लक्ष केंद्रित करावे असे उपस्थितांना मार्गदर्शन केले.तालुका कृषी अधिकारी श्री उमेश जाधव यांनी जमिनीतून पाण्याचा फक्त उपसा न करता विहिर पुनर्भरण करावे व सेंद्रिय शेती करण्यासाठी उपस्थिंना प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री कामाजी ठोंबरे कृषि अधिकारी यांनी केले यावेळी आजच्या दिवसाचे महत्व सांगण्यात आले आणि विविध कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली, व कृषी विभागाच्या कार्याबद्दल संक्षिप्त आढावा देण्यात आला.कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन श्री राम कानेकर ग्रामविकास अधिकारी यांनी केले.कार्यक्रमाचे सुनियोजन, व्यवस्था व कार्यक्रम उत्कृष्ट पार पाडण्यामागे मेहनत ही श्री सावन जाधव विस्तार अधिकारी कृषि व श्री विनय ढोणे विस्तार अधिकारी कृषि यांनी केले.

## अ.भा.ग्रा.पत्रकार संघ महिला मंच शहराध्यक्षपदी कांता काळे



प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती:** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने नुकतीच महिला मंच कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे . यामध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्ष कंचन मुरके यांनी समाजसेविका तसेच रुग्णसेविका कांता काळे यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळींच्या उपस्थितीत सर्वानुमते अमरावती महिलामंच चे शहराध्यक्ष पद देऊन कामाची जबाबदारी सोपवली आहे. अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ महिला मंच चे मला मिळालेले पद नसून यावर कार्य करणे म्हणजे मी माझे कर्तव्य समजेल आणि महिला पत्रकारांसाठी कायम कार्यरत राहील असे कांता काळे यांनी यावेळी बोलताना सांगीतले. याप्रसंगी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, शहराध्यक्ष किशोर बरडे, जिल्हाध्यक्ष वाघमारे, संतोष चव्हाण, संदीप सुने, तसेच अखिल भारतीय ग्रामीण भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# आमदार रवि राणा यांच्या निधीमधुन जुनिवस्ती बडनेरा अंतर्गत ८० लक्ष रुपयांच्या बांधकामाचे भुमीपुजन

### YSP मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या हस्ते संपन्न

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती :** अमरावती शहरातील प्रभाग क्र. २१ अंतर्गत जुनी वस्ती, बडनेरा परिसरातील नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आमदार रवि राणा यांच्या स्थानिक विकास निधीतून मंजूर करण्यात आलेल्या सुमारे ५० लाख रुपयांच्या विविध रस्ता विकासकामांचे भूमिपूजन YSP मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात व शेकडो स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत संपन्न झाले.



या विकासकामांमध्ये SOS ते नारायणा स्कूलपर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम तसेच निलेश थोटे यांच्या घरासमोरील रस्ता बांधकाम या महत्त्वाच्या कामांचा समावेश आहे. या दोन्ही रस्त्यांवरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी व वाहनधारकांची वर्दळ असते. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचणे, खड्डयांमुळे अपघाताचा धोका निर्माण होणे, तसेच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत होत्या. स्थानिक नागरिकांनी वारंवार केलेल्या मागणीची दखल घेत आमदार रवि राणा यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून या कामांसाठी सुमारे ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करून परिसराच्या विकासाला गती दिली आहे. या कामांमुळे परिसरातील रस्ते अधिक मजबूत, सुरक्षित व दर्जेदार होणार असून नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना भ्एझ् मार्गदर्शक सुनिल राणा यांनी सांगितले की, जनतेच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आमदार रवि राणा यांचे नेहमीच प्राधान्य राहिले आहे. परिसरातील नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची दखल घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. विकासकामांच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागाचा सर्वांगीण विकास व्हावा, हा आमचा संकल्प आहे. मंजूर झालेली सर्व कामे उच्च दर्जाची व निर्धारित कालावधीत पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

# गोरक्षण संस्थेला वध्यंत्व शिबीराचा लाभ

### नरदोडा येथील शासकीय पशु वैद्यकीय चमूचे सहकार्य

प्रतिनिधी ५ जुलै

**दर्यापूर :** महाराष्ट्र शासनाच्या पशुवैद्यकीय कार्यालयाद्वारे तालुक्यातील सर्वच केंद्रावर तथा गोरक्षण स्थळी वेळोवेळी विविध मोफत शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते . या नुसार दर्यापूर तालुक्यातील नरदोडा या केंद्रा अंतर्गत येत असलेल्या गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर नुकतेच वंध्यत्व तपासणी तथा निवारण शिबिर संपन्न झाले . या मध्ये जवळपास शंभर गायींची तपासणी करण्यात आली . सुविधा व संगोपन यासाठी तपासणी अहवाला नुसार गोरक्षण संस्थेस काळजी व औषध उपचार याबाबत योग्य सुचना देण्यात आल्या.

संपूर्णपणे मोफत राबविण्यात आलेल्या गोवंश संगोपनाच्या या महत्वपूर्ण सेवा शिबिरात पशुसंवर्धन दर्यापूर विभाग सहाय्यक आयुक्त डॉ प्रतिक बोडखे यांचे प्रमुख मार्गदर्शनात नरदोडा उपकेंद्राचे पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ वृषभ मानकर , परीचर अंकुश माहुलकर यांनी कार्य पूर्तता केली . याप्रसंगी सेवानिवृत्त पशुसंवर्धन आयुक्त डॉ दिपक उफाळे यांचा शिबीरातील उत्स्फूर्त सहभाग मोलाचा तथा प्रेरणादायी ठरला . गोरक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे संचालक प्रा . गजानन भारसाकळे यांनी शासनाच्या पशुसंवर्धन कार्यालयाचे तथा सर्व डॉक्टर सेवार्थी यांचे आभार व्यक्त केले . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे यांचे सह दैनंदिन गोसेवक अंकुश घरडे, संतोष गवई, श्रीकृष्ण पोटे व ज्ञानेश्वर गवई यांचेही यथोचित सहकार्य लाभले .

# खोलापुर येथील खुनाच्या गुन्ह्यांतील फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण कडून जेरबंद

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती:** खोलापुर येथील खुनाच्या गुन्हयांतील फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण कडून जेरबंद केले.

आरोपी सौरभ धर्मा शिरसाठ वय २१ वर्ष रा. इब्राहीमपुर ता. भातकुली जिल्हा अमरावती. असे आहे. ९ जून रोजी फिर्यादी नामे सुनिल रमेश कांबळे वय ४० वर्ष रा. उदापुर ता. भातकुली यांनी पो.स्टे. खोलापुर अप. क्रं. ९८/२६ कलम १०९,३५२,३ (५), १०३(१) भा.न्या.स प्रमाणे तक्रार दिली कि, फिर्यादीचा चुलत साळा याने फिर्यादीकडून २००० रु. घेतले होते. त्याच्या बदल्याने त्याचा मोबाईल फिर्यादीकडे होता. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी आरोपी हे मोबाईल घेणे करीता फिर्यादीचे राहते घरी गेले असता, त्यांच्यात



वाद झाला व सदरच्या वादात आरोपीतांनी मिळून फिर्यादीच्या पोटात चाकु खुपसुन त्यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी केले होते उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला होता. सदर गुन्हा दाखल झाल्यापासुन नमुद आरोपी हा फरार होता.

दिनांक ०४/०७/२०२६ रोजी पो.उप.नि. मुलचंद भांबुरकर व त्यांचे पथक सदर गुन्हयांचा तपास करीत असतांना गोपनीय बातमीदारांकडुन खबर मिळाली कि, आरोपी नामे सौरभ शिरसाठ रा. इब्राहीमपुर ता. भातकुली हा त्याचे इंदिरा नगर यवतमाळ येथे त्याचे परीचीत असलेल्या व्यक्तीकडे राहत आहे. अशा प्राप्त माहितीच्या आधारे तात्काळ आरोपी नामे सौरभ धर्मा शिरसाठ वय २१ वर्ष रा. इब्राहीमपुर ता. भातकुली जिल्हा अमरावती. यास ताब्यात घेण्यात आले. वरुन आरोपीस गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने खुनाच्या गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास पुढील कार्यवाही करीता पो.स्टे. खोलापुर यांचे ताब्यात देण्यात आले.

## सायबर गुन्ह्यात पुढील दोन आरोपींना अटक

**अमरावती:** जिल्ह्यामध्ये गरीब व मजूर वर्गातील नागरिकांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्या नावाने बँक खाती उघडण्यास प्रवृत्त करण्यात येत होते. त्यानंतर संबंधित व्यक्तींकडून बँक पासबुक, एटीएम कार्ड, आधार लिंक मोबाईल क्रमांक व इतर आवश्यक कागदपत्रे ताब्यात घेऊन त्याबदल्यात किरकोळ मोबदला देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या बँक खात्यांचा वापर सायबर फसवणूक, ऑनलाईन गेमिंग व इतर बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांसाठी करण्यात येत असल्याच्या तक्रारी पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण निकेतन कदम यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन शिरखेड, अमरावती ग्रामीण येथे अपराध क्रमांक २१६/२०२६, कलम ३१६(२), ३१८(४) भारतीय न्याय संहिता तसेच कलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# विद्यापीठातर्फे 'पी.जी. डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस' अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी ५ जुलै

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या पुढाकाराने आरोग्य क्षेत्रात सज्ज व्यावसायिक घडवण्यासाठी 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस' (संसर्गजन्य आजारांचे मॉलिक्युलर निदान यातील पदव्युत्तर पदविका) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या प्रगत सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस ॲन्ड रिसर्च द्वारे संचालित हा विशेष अभ्यासक्रम शैक्षणिक लाईफ सायन्सेस (जीवन विज्ञान) आणि क्लिनिकल डायग्नोस्टिक्स (वैद्यकीय निदान क्षेत्र) मधील दरी साधण्याचे काम करेल.




जागतिक आरोग्य यंत्रणा साथीच्या आजारांचा सामना करण्यासाठी आणि रुग्णांच्या गुंतागुंतीच्या उपचारांचे व्यवस्थापन करण्यासाठी वेगाने आणि अचूकपणे केल्या जाणाऱ्या अणुवांशिक ओळखीवर अधिकाधिक अवलंबून आहे. पारंपारिक चाचणी पद्धतींची जागा आता उच्च क्षमतेच्या अत्याधुनिक मॉलिक्युलर कार्यपद्धती घेत आहेत. हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम थेट बाजारातील गरजांशी सुसंगत आहे, ज्यामुळे पदवीधरांना आधुनिक निदान प्रयोगशाळा, सार्वजनिक आरोग्य संस्था आणि फार्मास्युटिकल (औषध निर्माण) संशोधन केंद्रांमध्ये स्पर्धात्मक आघाडी मिळते.

**करिअरच्या संधी आणि उद्योगातील मागणी**

या अभ्यासक्रमाचे पदवीधारक सरकारी आणि खाजगी लाईफ सायन्स (जीवन विज्ञान) क्षेत्रातील मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्स स्पेशालिस्ट, मेट्रोपोलिस लॅब्स किंवा अपोलो डायग्नोस्टिक्ससारख्या कॉर्पोरेट प्रयोगशाळांमध्ये काम करणे, रिसर्च असोसिएट, प्रगत वैद्यकीय चाचणी केंद्र, विद्यापीठांच्या मुख्य संशोधन सुविधांमध्ये संशोधन सहाय्यक म्हणून कार्य करणे, तांत्रिक सल्लागार, जागतिक बायोटेक कंपन्यांसाठी मॉलिक्युलर उपकरणांच्या उत्पादन विक्री आणि लॉजिस्टिक व्यवस्थेचे व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी, प्रादेशिक पातळीवर पसरणाऱ्या आजारांचा मागोवा घेणे तसेच आरोग्याच्या आणीबाणीच्या काळात राज्य रोगराई नियंत्रण पथकांना मदत करणे आदी विविध प्रकारच्या करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

विद्यापीठातील सीएमडीआर उत्कृष्ट शैक्षणिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असून मोठया वैद्यकीय केंद्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अचूक निदान प्रणालीवर थेट काम करण्याची संधी या ठिकाणी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यार्थ्यांना नॉलेज रिसोर्स सेंटर, विस्तृत शैक्षणिक ग्रंथालये आणि कॅम्पसमधील वसतिगृह आदी सुविधांचा पूर्ण लाभ मिळेल. याशिवाय अनुभवी मार्गदर्शक तसेच आंतरराष्ट्रीय संसर्गजन्य रोग संशोधनाचा दांडगा अनुभव असलेल्या वरिष्ठ लाईफ-सायन्स प्राध्यापकांच्या थेट मार्गदर्शनाखाली अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.-MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135